# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १४९वी बैठक आज मंगळवार, दि.०७.०७.२०२० रोजी पार पडली

मुंबई, मंगळवार दिनांक ७ जुलै, २०२० — मा.श्री.एकनाथ शिंदे, अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा नगर विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दूरचित्रसंवादाद्वारे (Video Conferencing) झालेल्या बैठकीमध्ये पार पडली. बैठकीमध्ये प्रास्तविक व विषयांचे सादरीकरण प्राधिकरणाचे महानगर आयुक्त, श्री. आर.ए.राजीव यांनी केले. सदर बैठकीत खालील महत्वाचे निर्णय घेण्यात आले :-

१. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारकाच्या पुतळ्याच्या उंचीवाढीस सुधारीत प्रशासकीय मान्यता मंजूर.

२. खाजगी विकासकामार्फत मेट्रो स्थानकालगतच्या बांधकाम/विकास कामांना मेट्रो स्थानकातून थेट जोडणी मार्ग धोरण मंजूर.

३. मुंबई महानगर प्रदेशामधील शहरी हवाई रज्जू मार्गाच्या मार्गिकेत केलेल्या सुधारणेस व प्रकल्प अंमलबजावणीची मंजूरी.

४. मेट्रो प्रकल्प २-अ व ७ च्या बहु वाहतूक परिवहन एकत्रिकरणाच्या अंमलबजावणीस प्रशासकीय मंजूरी.

५. मुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक तिकीटीकरण पद्धतीच्या अंमलबजावणीच्या सुधारीत प्रस्तावास मंजूरी.

६. शिळफाटा व कल्याण फाटा येथील प्रस्तावित उड्डाणपुलाच्या व कल्याण फाटा येथील भुयारी मार्गाच्या बांधकामाकरीता लागणाऱ्या वाढीव खर्चास मंजुरी.

७. मुंबई महानगर प्रदेशात अग्निशमन सेवा स्थापन करण्यास मंजूरी.

८. सुर्या नदी पात्रातील एकूण ५ बंधाऱ्याच्या बांधकाम करण्यासाठी व अनुषंगीक कामे पार पाडण्यासाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळास रु.५०.९८१ कोटी पर्यंत वित्त पुरवठा करण्यास मंजूरी.

९. माथेरान येथे फ्युनिक्युलर रेल्वे प्रणालीची सार्वजनिक-खाजगी-भागीदारी-पीपीपी तत्वावर अंमलबजावणीसाठी मंजूरी.

१०. वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ई"-ब्लॉकमधील इमारतीच्या पुर्नविकासास तत्वत: परवानगी देण्याबाबत मंजूरी.

११. वांद्रे-कुर्ला संकुल येथील "जी" ब्लॉकमधील मनोरंजनासाठीची जागा आरजी-६, आरजी-१९, आरजी-२३ व टेकडी या भूखंडाच्या विकासाकरीता (डिझाईन, फायनान्स, बिल्ड, ऑपरेट व ट्रान्सफर) (DFBOT) एजन्सीची नियुक्ती करण्याबाबत मंजुरी.

१२. सिटी पार्क, वांद्रे-कुर्ला संकुल ते महाराष्ट्र निसर्ग उद्यान दरम्यान सुमारे ५५० मी. पादचारी झुलता पुलाच्या अंमलबजावणीस मान्यता.

१३. इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन लि.यांस वांद्रे-कुर्ला संकुलात सी-५० या त्यांच्या अस्तित्वातील भूखंडाशेजारी अतिरिक्त भूखंड वाटप करण्यास मंजूरी.

१४. मे.हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स लि. यांची जमिन खरेदीस मंजूरी.

१५. काळू पाणी पुरवठा प्रकल्प ता.मुरबाड, जि.ठाणे – MMR क्षेत्रातील पूर्व उप-प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी पाणी पुरवठा करण्याकरीता काळू धरण प्रकल्पातील वन जमिनीतील नक्त वर्तमान मुल्यची रक्कम अदा करण्यास मंजूरी.

१६. वडाळा अधिसूचित क्षेत्रामध्ये रुग्णालय व शाळा विकसीत करण्यासाठी भूखंड वाटपाची निविदा मागविण्यास मंजूरी.

या सह अन्य बाबीस प्राधिकरणाने मान्यता दिली.

*****


MUMBAI METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY




प्रदेश विकास प्राधिकरण
TROPOLITAN REGION
MENT AUTHORI